## *) वाक्य प्रकार (* (Types of sentences)

- वाक्यांचे अर्थावरुण वाक्यांचे चार प्रकार आहेत.

① विधानार्थी वाक्य (Assertive)

② प्रश्नार्थी वाक्य (Interrogative)

③ आज्ञार्थी वाक्य (Imparative)

④ उद्गारार्थी वाक्य (Exclamatory)

### ⇒ ① विधानार्थी वाक्य (Assertive sentence)

- मराठी वाक्यामध्ये वाक्याच्या कर्त्याने जर फक्त एखादे विधान केलेले असेल, तर त्या वाक्याला विधानार्थी असे म्हणतात.
- विधानार्थी वाक्याच्या शेवटी नेहमी पूर्णविराम (.) हे विरामचिन्ह वापरलेले असते.
- उदा. - समीर दररोज शाळेत जातो.
  मी नियमित व्यायाम करतो.

### ② प्रश्नार्थी वाक्य (Interrogative sentence)

- मराठी वाक्यामध्ये वाक्याच्या कर्त्याने जर एखादा प्रश्न विचारले असेल, तर त्या वाक्याला प्रश्नार्थी वाक्य असे म्हणतात.
- प्रश्नार्थी वाक्याच्या शेवटी नेहमी प्रश्नचिन्ह (?) हे विरामचिन्ह वापरलेले असते.

उदा - सायली, सहलीला जाणार आहेस का?
तुझ्या घरात किती माणसे आहेत?

## ③ आज्ञार्थी वाक्य (Imparative sentence)

- मराठी वाक्यामध्ये जर वाक्यांतील क्रियापदांवरुन आज्ञा करणे, प्रार्थना करणे, आर्शीवाद देणे, विनंती करणे किंवा उपदेश करणे या गोष्टींचा बोध होत असेल, तर अश्या वाक्यांना आज्ञार्थी वाक्ये म्हणतात

1) मुलांनो, शिस्त पाळा (आज्ञा)
2) देवा, मला चांगली बुद्धी दे (प्रार्थना)
3) तुम्हाला तुमच्या कार्यात यश मिळो (आशीर्वाद)
4) सरोज, कृपया मला वही दे (विनंती)
5) समाजाने नेहमी भले करा (उपदेश)

- आज्ञार्थी वाक्याच्या शेवटी नेहमी पूर्णविराम (.), हे विरामचिन्ह वापरलेले असतात.

## ④ उद्‌गारार्थी वाक्य (Exclamatory sentence)

- जर वाक्यात मनातील भावना किंवा तीव्र इच्छा उद्‌गारातून व्यक्त झाल्या असतील तर अश्या वाक्यांना उद्‌गारार्थी वाक्ये म्हणतात
- उद्‌गारार्थी वाक्यामध्ये केवलप्रयोगी अव्ययानंतर नेहमी उद्‌गारचिन्ह (!) वापरलेले असते.

- उदा. - अरेरे! धावतांना पडला तो.
  शाब्बास! जिंकलास तू.
  बापरे! केवढा हा पसारा

केवलप्रयोगी अव्यय

# *) वाक्यप्रकार (*

•) पुढील वाक्यांचा प्रकार ओळखा:-

1) शाब्बास! किती छान काम केलेस तू! -

2) मुलांनो, शिस्तीने वागा. -

3) माझे घर नदीकिनारे आहे. -

4) तुला पेढा आवडतो का? -

5) मुलांनो, रांगेत चाला.

6) अरेरे! किती वाईट झाले! -

7) तू सहलीला येणार आहेस का? -

8) राजू नेहमी व्यायाम करतो. -

9) दुसऱ्यांचे नेहमी भले करा. -

10) मी पक्षी झालो तर! -

11) किती सुंदर देखावा हा! -

12) मला माझे पुस्तक दे. -

13) उदय माझा मित्र आहे. -

14) कुठे गेली आई तुझी? -

15) सरिता, मंडईत जा. -

16) अबब! केवढा मोठा हत्ती हा! -

17) गोंगाट करू नका. -

18) काय झाले तुला? -

19) किती उंच ही इमारत! -

20) आम्ही सारे भारतीय आहोत. -